Vol 1 Issue 9 March 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012pp.1-4

Research Paper

# *मोनिका गजेंद्र गडकरांचे कथाविश्व*

*किसन संदिपान पवार*
विज्ञान महाविद्यालय सांगोला.

*सारांश :*

मराठी साहित्यविश्वात आपल्या दमदार व आश्वासक लेख .लेक्षवेधी दीर्घकथा लेखन करणाऱ्या मोनिका गजेंद्र गडकर .कोणत्याही भूमिकेत न अडकता भिडलेल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून ,मानवी जीवनातील विविधांगी अनुभवांच्या व समस्यांच्या मुळाशी जाऊन,मानवी जीवन जाणिवेतील आनेणिवेतील सूक्ष्म खोलवर दडलेली रूपे शोधणाऱ्या या दीर्घकक्षांनी मराठी कथाविश्वाला एक वेगळाच आयाम दिला.

***प्रस्तावना –***

1992–93 च्या काळात मोनिका यांनी कथा लेखनास सुरूवात केली.आजपर्यंत त्यांचे भूप (2004),आर्त (2008),आणि शिल्प (2011) असे तीन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी प्रत्येक कथा संग्रहात सांख्यिकी सहा अंकाचा क्रम ठेवून 18 कथा संग्रहातून प्रकाशित झाल्या. कथा संग्रहाच्या शीर्षकात सुध्दा दोन वर्णाचा क्रम जपला आहे.

भारतीय समाज व्यवस्था आणि भारतीय संस्कृती विविध संकेतात,अडकली आहे.ही समाज व्यवस्था वर वर पाहता सुस्थितीत दिसते,परंतू तसे मात्र नाही. कारण मानवी जीवनाच्या अर्थाबद्धल,मानवी नाते संबंधाबद्धल व्यक्ती व्यक्तीच्या मनातील वृत्ती–प्रवृत्ती बद्धल आणि दुरावलेपणाबद्धल कधी जवळीकतेचा सांबा जोडते.तर कधी तोडते.एकूणच पिढयानं,पिढया मानव जातीवर अन्याय,अत्याचार, अशा सारख्या संकेतात अडकलेली आहे.जागतिकीकरण आले,चंगळवाद डोकावू लागला.राजकीय,आर्थीक,व सामाजिक सत्तेची गणित बदलू लागली .परिणामतः समाजात मूल्यभ्रष्टता वाढीस लागली. आणि जीवनमूल्यांची पायमल्ली होऊ लागली.अशा सार्वत्रिक वातावरणात मोनिका गजेंद्र गडकर यांची कथा वेगळेपण घेऊन अस्तित्वात आली.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथातील अनुभव विश्वाकडे पाहिले असता मानवी जीवन जाणिवेतील सूक्ष्म आंदोलनाचा वेध घेताना दिसते.विविध पातळयांवरील नाते संबंधातील तुटलेपण–जुळतेपण, निरपेक्ष मैत्रीपूर्ण संबंधाचे भावविश्व साकारताना दिसते. कलावंताचे कलेवरील नितांत प्रेम,त्यांच्या प्रतिभेला, सर्जनशीलतेला मिळालेली प्रेरणा , मानवी मनातील स्व – स्वातंत्र्याची जाणीव यातून तडकलेल्या – विस्कटलेल्या व्यक्तीच्या मनातील भाव विश्व यातून कथारूप धारण करताना दिसते. पारंपारिक कौटुंबिक व्यवस्थेत अडकलेली स्त्री,स्वत्वाच्या शोधासाठी धडपडते.तसेच मृत्यूचे चिंतन,पुरूष केंद्री धर्मव्यवस्था मनोरूग्णाची कृती –विकृती इ.परिणती त्यांच्या कथातील शक्तीकेंद्रे बनली आहेत.

मानवी मनाच्या चिंतनाबरोबर स्त्री चिंतनाची भूमिका (धर्म,शरीर,श्रध्दा) माणसाचे निवड स्वातंत्र्य आणि त्यातील फसवेपणा,(भूप,जन्म) स्त्री – पुरूष भेदापलिकडे असणाऱ्या नात्यातील बदल,(संक्रमण) कलावंताच्या सर्जनशीलतेला मिळालेली शारीरिक अथवा लैंगिक प्रेरणा (आधार,भूप,शिल्प) मनोरूग्णाच्या जाणिवेतील नेणिवेतील गूढता, (आधार,शिल्प,तीर,जाणीव ) पुरूष प्रधान संस्कृतीचे पाश आणि धर्म व्यवस्थेचा अडसर (रूटस,अनोळखी,शरीर,धर्म)त्याचबरोबर मोनिकानी वेगळया वेगळया समाजाचे म्हणजे मुस्लिम समाजाचे कुठलाही आडपडदा न ठेवता अस्सल चित्ररूपात (श्रध्दा,धर्म,शरीर) इ.कथांतून त्या समाजाचा मोहोल,त्यांच्या चाली रीती,दुःख,त्यांचे विविधांगी प्रश्न व त्यांचे भोग या सर्वाना कवेत घेवून त्यांच्याच अनुभव विश्वातून कथाविष्कार घडविला आहे.

वरील अनुभव विश्वाला आकार देणारी विविधांगी विलक्षण पात्रे त्यांच्या कथांत येतात. पायांच्या आयुष्यात जे काही घडते ते विशेषतः स्त्री पायांच्या बाबतीत घडताना दिसते.स्त्री ची वेदना,स्त्रीच्या समस्या उदा. मुमताजच्या वाटयाला जे भोगलेपण येतं,त्यातून वाट काढणे चालू....विविध दुःखाच साम्राज्य उरी बाळगणारी सायरा......प्रियकराच्या अन्यायाला बलात्काराला बळी पडलेली व न्याय मागण्यासाठी तो या जगात न राहणे,गायत्र्जी (व्रण) दोन शरीर संवेदनाची वासना,विकारामागचा एकटेपणा,शारीरिक सुखातून,अपूर्णाकेतून पूर्णत्वाची निर्मिती शोधणारी मामाची कला चित्रकार ......आधार मधील अरूट चिपलकही ,नियतीनं घाला घातलेला ......मतिमंद देवेन लग्न न करता मैत्री खातर एकत्र राहणारी निर्मला कोरेगांवकर ,मैत्रीतून गर्भारपण आलंतरीपण पोटातील जीवाला आधार देणारी निर्मला व बापाचा आधार देणारा पुरातत्व संशोधक डॉ.दिनकर ,नोकरी निमित्त परदेशात गेलेली आणि नाते संबंधात दुरावलेपण आलेली मंदार,विवाह बाहय संबंध ठेवणारी सुमित्रा,नाळ अशा विविधांगी स्त्रियां वेगवेगळया दुःखाला,समस्येला,सामोऱ्या जाताना दिसतात. पिचकून आणि खचून न जाता तेवढयाच ताकदीन ,उभारीने उभ्या राहतात. काही स्त्रियां घटस्पोटीत ,काही स्त्रियां परित्यक्ता विवाह बाहय संबंधातून आलेलं गर्भारपण ,सर्व काही निभावून नेणारी स्त्री कक्षांतून साकारली आहे.त्यांच्या कथांतील स्त्री पात्रेही जशी जुन्या पिढीतील तशी नव्या पिढीतील ही आहेत.भूप कथेतील मंगला , देणं कथेतील निर्मला ,व्रण कथेतील कायत्री .....आणि धर्म कथेतील गौतमी इ.पात्रांना कवेत घेणारी त्यांची कथा आहे. तरीही मोनिकाची कथा बनत नाही , तर ती स्त्रीकेद्री आहे. हे मान्यच आहे.त्यांच्या कथांत स्त्री पायाबरोबर विविधांगी पुरूष पात्रे ही येतात.ही पुरूष पात्रे विलक्षण आहेत. लेखिका स्वतः कलावंत असल्याकारणांने कथात शिल्पकार , चित्रकार ,मूर्तीकार ,संगीतकार,लेखक आणि प्राध्यापक इ. व्यक्तीरेखांना कलावंत आणि त्याची कलाप्रेम या माध्यामांतून जिवंतपणे साकारली आहेत. विलक्षण पुरूष पात्रे तिरसट स्वभाव शरीर मधील अहमद स्वकेंद्री , मनस्वी असलेला स्वैरवर्तनाचा कैलासनाथ जन्म, काही पुरूष पात्रे अहंकारी आहेत. काही तडजोड करणारी आहे. काही तडजोड करणारी नाहीत. काही परदेशात असून देखील मायदेशी येऊन कर्तव्य पार पाडणारी मंदार .....अशा या विविधांगी व्यक्तिरेखातून कथा साकारतात. एकूणच या तीनही कथा संग्रहातून व्यापक संस्कृतीच दर्शन या पात्राकरवी घडताना दिसते. त्यांची कथा वाचकाला वाचताक्षणी अंतर्मुख बनविते.

मेनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांतील एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे त्यातून रेखाटलेलं वैविध्यपूर्ण नाते संबंधाचे .पती पत्नीचा संसार सुखात असतानाही विवाबाहय संबंध ठेवणारी सुमित्रा,परत नव – याकडे येते.मतिमंदत्वाची तीव्र जाणीव मामा या नात्याने देवेन भाचा . ....मामा नातं . मामाचं कलेशी जोडलेलं नातं. त्यांच्या सर्वच कथा मधील नात्यागोत्यामध्ये अनेक प्रकारची नाती आहेत. बापलेक , मायलेक, भाऊ बहीणी,दोन भाऊत –हेत–हेची .त्यांच्या सगळया कथांतूनही विविध अशी नाती विविध अनुभवांतून मांडलेली आहेत. ती कधी संवादी असतात तर कधी विसंवादी बनतात.त्यांच्या कथात अनेक प्रकारचे मृत्यू आणि अनेक प्रकारचे मनोविकार असणारी पात्रं ही येतात. मॅनिया ,डिप्रेशन , हिस्टेरिया इ. ही पात्रं सगळया भोगातून जाताना ,प्राक्तनातून जाताना ही माणसं कधी कधी दुरावतात .पुन्हा ती मूलभूत स्पर्शाने जोडली जातात. त्यांच्या कथांत तुटणं आहे परत जुळणं आहे. विसंवाद आहेत,परत विसंवादातून संवाद घडतो आहे. ही पात्रं शेवटी मूलभूत स्पर्शाच्या धाग्यानं एकत्र जोडली जातात.एकमेकांशी अनुबंध जोडतात.

मोनिकांच्या कथा एका अर्थाने चर्चा कथा आहेत.त्यात केवळ घटना ,पात्रं , प्रसंग असे कथातंत्र त्यात नसून तर तिच्या कथांत चर्चात्मकता आहे. त्यांची सारखी कथा स्त्रियां आणि धर्म यांच्यातील नातं शोधत शोधत चर्चा घडते.,पुरूषाचा विशेषतः स्त्रियांचा धर्म या विषयी चर्चा घडताना दिसते.आणिखी एका वेगळया समाजाकडे म्हणजे मुस्लीम समाजाचे चित्रण श्रध्दा ......धर्म आणि शरीर या कथामधून साकारते. त्यांनी त्या समाजाचं चित्रण करताना,त्यांचा समाज,मोहोल,त्यांचे प्रश्न त्यांचे स्त्रियांच्या माध्यामातून कुठेही बडेजाव न करता,ती स्त्री आपल्या नशिबाला आलेले भोग आहेत या नात्याने ती जीवन जगते हे कोठेही बडेजाव न करता मांडतात.विलक्षण क्रौर्य ही दाखवून जातात हा वेगळेपणा.

मोनिकांच्या सर्व कथात निवेदन तर आहेच,त्यातूनच कथा साकारता साकारता संवाद......अतिशय धारदार असे संवाद कथाभर येताना दिसतात.आणि राजध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणे कथा निवेदनापेक्षाही संवादातून पुढे सरकते.एका संवादातून एक कथा तयार होते.काही वेळा एका संवादातून एका कथेला सुरूवात त्यातून दुसरी कथा जन्म घेते.आणि मग पहिली कथा जरा बाजूला ठेवून मोनिका त्या दुसऱ्या कथेवरच लक्ष केंद्रीत आणि तिची मूळ कथा अनेक केंद्री होते. अनेक पदरी होते.त्यांच्या कथेतील विलक्षण पात्रे विविधांगी अनुभव निवेदकाच्या दृष्टिकोनातून साकारताना हिंदी,इंग्रजी आणि संस्कृत भाषेचा कलात्मक उपयोजन करतात. कथेतील वातावरण निर्मिती , पात्रचित्रण , पात्र्ज्ञांच्या मनोज्ञ दर्शनातून कलात्मक रूप घेताना दिसतात.

मानवी जीवनातील विविधांगी स्पंदनशील लयीतील अनुभव विश्वाला साकारणारी विविध वृत्ती – प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा दृश्यात्मक वातावरणनिर्मिती,संवेदनशील वाचकांच्या हृदयाला भिडणारा संवाद बाज,इ.साहय्याने त्यांच्या कथेने मानवी जीवनातील विविध कंगोऱ्याला समर्थपणे भिडताना दिसते. मराठी कथाविश्वात तर भर घालणारी आहेच.त्या संदर्भात विजया राजाध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणे वर्तमान तर लक्षणीय तर आहेच. पण भविष्य ..... ही लक्षणीय राहणारच.

***संदर्भ ग्रंथ –***

1.अरूणा ढेरे,(संपा), स्त्रीलिखित मराठी कथा (1950 ते 2012) पदमगंधा प्रकाशन,पुणे.प.आ.2014.
2.सुधा जोशी, कथा :संकल्पना आणि समीक्षा,मौज प्रकाशन गृह,मुंबई पदु.आ.2014.
3.मोनिका गजेंद्र गडकर, भूप,सौज प्रकाशन गृह,मुंबई. प.आ.2004.
4. मोनिका गजेंद्र गडकर, आर्त,मौज प्रकाशन गृह,मुंबई, प.आवृत्ती 2008.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org